विनम्रता
आणि अहंकार
हे एकत्र
कधीच राहू
शकत नाहीत

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ९ एप्रिल २०२५ | अंक ११८० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देवाचा अवतार आहेत असे मला वाटत नाही, ते माणसाचेच अवतार आहेत.रामदास आठवले



## नरेंद्र मोदी यांचे वय झाले असले तरी ते अजूनही कणखर

**पंतप्रधान नरेंद्र मोदी चौथ्यांदा पंतप्रधान होतील का याबद्दल त्यांना विचारणा करण्यात आली. त्यावर ते म्हणाले, विरोधकांकडे केवळ वाद उभे करण्याशिवाय दुसरे कोणतेही काम नाही. नरेंद्र मोदी यांचे वय झाले असले तरी ते अजूनही कणखर आहेत आणि २०२९ मध्ये तेच पंतप्रधान बनतील, अशी माझी अपेक्षा आहे. विरोधकांची ताकद क्षीण झाली आहे. या पाच वर्षात आम्ही चांगले काम करणार आहोत, त्यामुळे जनता पुन्हा आम्हाला सत्तेत आणेल. विरोधकांनी कितीही प्रयत्न केले तरी पंतप्रधान नरेंद्र मोदीच होणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

## “मी सहमत नाही”



“पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देवाचा अवतार आहेत असे मला वाटत नाही, ते माणसाचेच अवतार आहेत. जगभरातील पंतप्रधानांच्या सभेत ८० टक्के लोकांनी नरेंद्र मोदींना पसंती दिली. ते अतिशय मजबूत पंतप्रधान आहेत आणि जगातील लोकप्रिय नेते म्हणून त्यांचे नाव आहे. मात्र, ते देवाचा अवतार आहेत या मताशी मी सहमत नाही”, असे रामदास आठवले म्हणाले.

बॉलिवूड अभिनेत्री आणि हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील खासदार कंगना रणौत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल एक मोठे विधान केले आहे. “पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सामान्य मानव नसून अवतार आहेत. २०१४ पर्यंत मी मतदानालाही गेले नव्हते. मला नेत्यांबद्दल द्वेष होता, पण आता लोक चांगले काम सोडून राजकारणात आले आहेत. कारण आता नरेंद्र मोदींच्या रूपाने एक चांगला नेता आपल्याकडे आहे. या आधी सगळे खात होते आणि देशाची नासधूस करत होते”, असे विधान कंगना रणौत यांनी केले आहे. आता कंगना रणौतच्या या विधानावर आता केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज बुलढाणा येथे पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी विविध राजकीय घडामोडींवर आपले मत व्यक्त केले. रामदास तडस यांना राम मंदिरात प्रवेश नाकारल्यासह, आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांपर्यंत अनेक विषयांवर त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना कंगना रणौतने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यावर विचारणा करण्यात आली. त्यावरही त्यांनी स्पष्टपणे भूमिका मांडली.




# सौताडा शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात.

पाटोदा प्रतिनिधी :- सौताडा जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सातारा या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन सौताडा जिल्हा परिषद माध्यमिक शाळा या ठिकाणी उत्साहात संपन्न झाले सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक गणेश बेद्रे सर हे होते तसेच वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाला जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे माजी शिक्षक फुले सर ,गावडे मॅडम ,जायभाय सर ,टेकाळे सर ,सरडे सर ,गुगळे सर , सरोदे सर आदी शिक्षकवृंद प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थिनी कावेरी नामदेव सानप यांनी केले तसेच २०१०/११ बॅचमधील विद्यार्थ्यांनी शाळेतील त्यांच्या कडु गोड आठवणींना उजाळा दिला, त्याचप्रमाणे शाळेत प्रवेश घेतल्यापासून शालांत परीक्षेला जाईपर्यंतचे अविस्मरणीय क्षण, अविस्मरणीय आठवणींना उजाळा दिला ,बालपणीचे सवंगडी, दोस्त,सखा ,जिगरी , मित्र, बालमित्र, बाल मैत्रीण अनेक वर्षानंतर भेटल्यानंतर अविस्मरणीय क्षण डोळ्यासमोर तरळल्याने विद्यार्थी भावुक झाले . शाळेत प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी हा मातीचा गोळा असतो त्या मातीच्या गोळ्याला आकार,ऊकार देण्याचं पवित्र कार्य शिक्षक करत असतात आज आंम्ही जि प शाळेचे माजी असुन आज कुणी डॉक्टर, वकील, उद्योजक,शिक्षक , पोलिस, इंडियन



आर्मी, पोस्ट मास्टर शेतकरी , मेकॅनिक, ड्रायव्हर, ऑपरेटर,कुक , तसेच विविध क्षेत्रांमध्ये नावलौकिक मिळवत आहेत ते सर्व शाळेतील शिक्षक जायभाय सर ,रानमारे सर, गावडे मॅडम,सरडे सर, गुगळे सर सरोदे सर, फुले सर यांच्या मार्गदर्शनामुळे झाले आहेत.त्या सर्व शिक्षकांना आंम्ही सर्व विद्यार्थी मनापासून धन्यवाद देतो व नमन करतो . प्रत्येक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले व सध्या कोणत्या क्षेत्रात किंवा पदावर कार्यरत आहे त्यासंबंधी माहिती दिली.तसेच शिक्षकवृंद यांनी यापूर्वी माजी विद्यार्थी यांनी स्नेहसंमेलन कार्यक्रम आयोजित केले परंतु हा पहिलाच कार्यक्रम आहे तो शाळेच्या आवारात आयोजन केला त्यामुळे अतिशय आनंद झाला व शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक.जि प शाळेचे माजी विद्यार्थी यांनी आपल्या शाळेसाठी,शाळेच्या प्रगती साठी, अडचणी दूर करण्यासाठी सहभागी झाल पाहिजे असे मत शाळेचे माजी शिक्षक रानमारे सर यांनी व्यक्त केले.तसेच फुले सर गावडे मॅडम जायभाय सर टेकाळे सर सरडे सर गुगळे सर सरोदे सर यांनीही मनोगत व्यक्त करणार ना माजी विद्यार्थ्यांचे विविध क्षेत्रातील नावलौकिक पाहून अत्याधंद होत असल्याचे त्यावेळी भावना व्यक्त केला तसेच विद्यार्थ्यांनी उद्योजक क्षेत्रामध्ये नोकरीमध्ये व्यवसायामध्ये शेतीमध्ये आपलं नाव कम शाळेचे व गावाचाही नाव लौकिक करावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# मोटारसायकल अपघातात दोन ठार



बीड । प्रतिनिधी नेकनूर येथून येळंबघाटकडे सोमवार (दि.७) रोजी रात्री आठ वाजता चाललेल्या दुचाकी क्र.एमएच २३ बीडी ९६९८ ला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने यामध्ये दोन युवकांचा मृत्यु झाला,तर एकजण गंभीर जखमी झाला. जखमीवर बीड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सविस्तर माहिती अशी की,नेकनूर येथील मिस्त्री काम करणारा युवक गणेश श्रीधर घरत (वय २९) याचा या अपघातात जागीच मृत्यु झाला, तर येळंबघाट येथील युवक पठाण अफजल पठाण अमजद (वय १७) याचा उपचारादरम्यान बीड येथे मृत्यु झाला. नेकनूर येथील बाबा कांबळे (वय ३८) हा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर बीड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुढील तपास नेकनूर पोलीस स्टेशनचे कॉन्स्टेबल रतन निगुळे, उबाळे हे करीत आहेत.


# धारूर तहसील कार्यालयात चार तास ठेवले प्रेत

## तहसीलदारांचे बीडीओंना कार्यवाहीसाठी पत्र;पोलीस बंदोबस्तात अंत्यविधी

किल्ले धारूर । प्रतिनिधी धारूर तालुक्यातील थेटेगव्हान येथील संजय नामदेव माळी वय ४२ वर्ष या व्यक्तीचा आजाराने मृत्यू झाला होता भिल्ल समाजाच्या जुन्या स्मशान भूमीवर काही लोकांनी अतिक्रमण केलेले असल्याने अंत्यविधीसाठी अडचण निर्माण झाल्याने मयत व्यक्तीचे प्रेत धारूर तहसील कार्यालयाच्या दारात चार तास आणून ठेवले होते तब्बल चार तासा नंतर तहसीलदार यांनी गटविकास अधिकारी आणि पोलीस प्रशासन यांना कार्यवाही करण्याचे पत्र दिल्यानंतर तहसील कार्यालयाच्या दारात ठेवण्यात आलेले प्रेत थेटेगव्हान येथे नेऊन अंत्यविधी करण्यात आला तत्पूर्वी मोठ्या संख्येने भिल्ल समाजाच्या महिला व पुरुषांनी तहसील कार्यालयाच्या दारात ठिय्या मांडला होता. धारूर तालुक्यातील थेटेगव्हान येथे मोठ्या प्रमाणावर भिल्ल समाज आहे या समाजाची १९९१ सालाची जुने गावठाण मध्ये २.१९ गुंठे स्मशान भूमी ची जागा आहे या जागेवर काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे हे अतिक्रमण काढण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय थेटेगव्हान, पंचायत समिती व तहसील कार्यालयाला धारूर यांना वारंवार अर्ज उपोषण करूनही जुने गावठाण मधील अतिक्रमण निघत नसल्याने भिल्ल समाजाच्या मयत व्यक्तींच्या अंत्यविधीचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे अशात दि.०७ एप्रिल रोजी संजय नामदेव माळी हा व्यक्ती निधन पावला मात्र अंत्यविधीला जागा नसल्याने थेटेगाव्हन येथील नागरिकांनी मयत व्यक्तीचे प्रेत सकाळी १२ वाजेच्या सुमारास धारूर तहसील कार्यालयाच्या दारात आणून ठेवले होते या प्रेतासोबत शंभर ते दीडशे महिला व दोनशे व्यक्तीनी तहसील कार्यालयासमोर ठिय्या मांडला होता जुन्या गावठाण मधील आमच्या हक्काची स्मशानभूमीची जागा आम्हाला मिळाल्याशिवाय आम्ही तहसील कार्यालयाच्या दारातील प्रेत हलवणार नाहीत या भूमिकेवर ठाम असलेले नागरिक तब्बल चार तासानंतर तहसील प्रशासनाने गटविकास अधिकारी यांना पत्र दिले असून संबंधित विषय आपल्या कार्यालयाशी निगडित असल्याने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणात आपल्या स्तरावर नियामाधिन कार्यवाही करावी व कार्यवाही केलेला अहवाल तहसील प्रशासनाला सादर करावा

# श्री दत्तगुरू मंदिर टाकळी श्री दत्त संस्थान पायी दिंडी सोहळा संपन्न

केज : मौजे टाकळी ता.केज येथील हे.भ.प.वै.प्रातःस्मरणीय ब्रम्हलीन वै.गोपिचंद बाबा भारती यांनी सुरू केलेल्या श्री दत्तगुरू मंदिर दत्त संस्थान टाकळी ता.केज ते नाथ (मुंगी) पैठण पायी दिंडी सोहळा दि.१३ मार्च २०२५ ते ३० मार्च २०२५ या कालावधीत प्रति वर्षाप्रमाणे पायी दिंडी काढण्यात आली व रंगपंचमीच्या दिवशी नाथ पैठण येथे पोहोचली.शांतीब्रम्ह श्री एकनाथ षष्ठी दिवशी या दिंडीची नगरप्रदक्षिणा काढण्यात आली.नाथ षष्ठीनिमित्त गुलाल व पुष्प शांतीब्रम्ह श्री संत



एकनाथ महाराज यांच्या प्रतिमेस अर्पण करण्यात आले.रंगपंचमी ,नाथषष्ठी,सप्तमी या दिवशी नाथ पैठण येथे थांबुन भजन, कीर्तन, प्रवचन, काकडाभजन व कालाष्टमी दिवशी काल्याचे किर्तन विद्वान श्री.अविनाश भारती महाराज यांनी करून ही पायी दिंडी परत निघाली. ह.भ.प.वै.गोपिचंद बाबा भारती यांनी ४५ वर्षांपूर्वी सुरू केलेला केज तालुक्यातील टाकळी ते नाथ पैठण पायी दिंडी सोहळा अखंडपणे सुरू आहे.या दिंडीचे सर्व भाविक भक्तांच्या व वारकऱ्यांच्या मदतीने कुशल व उत्कृष्ट नियोजनाने सुरू आहे.या दिंडी सोहळ्यानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज हे सहकुटुंब सहपरिवार व इतर वारकरी व भाविक भक्तांनी या सोहळ्याला नाथषष्ठी दिवशी नाथ पैठण येथे उपस्थित राहुन दिंडी सोहळ्याचा लाभ घेऊन आनंद घेतला.

# भाजपाचा स्थापना दिन परळीत साजरा

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत मुंबईत कार्यक्रम

परळी – भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस शहरात आज उत्साहात साजरा करण्यात आला. राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी झेंडावंदन करून तसेच फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला. ६ एप्रिल भाजपाचा आजचा स्थापना दिवस ना. पंकजाताई मुंडे यांच्या अरुणोदय मार्केटमधील संपर्क कार्यालयात अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. स्थापना दिनानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया यांच्या हस्ते भाजपच्या ध्वजाचे झेंडावंदन करण्यात आले. तत्पूर्वी ज्येष्ठ नेते शामाप्रसाद मुखर्जी, दीनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, लोकनेते गोपीनाथराव मुंडे, प्रमोद महाजन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व पेढे वाटून एकमेकांना स्थापना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दुपारी २ वा. कार्यालयात संघटन पर्व अंतर्गत मोठा स्क्रीन लावून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाचा कार्यकर्त्यांनी लाभ घेतला. यावेळी सतीश मुंडे, जुगलकिशोर लोहिया यांच्यासह प्रकाश जोशी, राजेश्वर देशमुख, महादेव इटके, राजेंद्र ओझा, नितीन समशेट्टे, मोहन जोशी, अनिश अग्रवाल, बंडू कोरे,अच्युत जोगदंड, चंदाताई ठोंबरे, राजेश कौलवार, सुशील हरंगुळे, अभिमान मस्के, विकास हालगे, मिलिंद कांबळे आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. ना.पंकजाताई मुंडे यांचा मुंबईत कार्यकर्त्यांशी संवाद



व आरोग्य शिबीराला भेट भाजपच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईतील माहीम विधानसभा मतदारसंघात आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीराला ना. पंकजाताई मुंडे यांनी भेट देऊन याठिकाणी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांशी संवाद साधला. तसेच महिला उद्योजिकांकरिता लावण्यात आलेल्या विनामूल्य स्टॉल्सशी पाहणी केली. स्थापना दिनानिमित्त लोकोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच याप्रसंगी मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाचा त्यांनी कार्यकर्त्यांसमवेत लाभ घेतला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ९ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

# माओवाद्यांच्या शांतता प्रस्तावाचे भविष्यातील परिणाम

देशविरोधी कारवाया करणाऱ्यांनी संवादाचा मार्ग स्वीकारणे हा अचंबा कमी होता म्हणून की काय, आता माओवाद्यांकडून वैमनस्य विसरण्याची अपेक्षा केली जाते आहे. कारवाई खंबीर असली, की कोणती किमया घडू शकते याचे प्रत्यंतर माओवाद्यांच्या या भूमिकेने दिले. माओवाद्यांच्या शांतता प्रस्तावाचे भविष्यातील परिणाम अद्याप अस्पष्ट आहेत. केंद्राच्या निर्णायक लढ्यातील संभाव्य यशाचे संकेत मात्र त्यात आहेत. माओवाद्यांचा शांतता प्रस्ताव सरकारला गु ंगारा देण्याचा प्रयत्न आहे की, मुदतीत नांगी ठेचण्याच्या प्रयत्नांमधील यश, ही चर्चा आता रंगेल. माओवाद्यांच्या प्रस्तावाकडे दुर्लक्ष न करता केंद्राच्या बुलंद इराद्यांची प्रशंसा व्हायला हवी. ङ्गअसाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणेफ या ओवीत प्रयत्नवादाचा सिद्धान्त येतो. नरेंद्र मोदी सरकारने काश्मिरातील ३७० कलम हटविण्याचे सुतोवाच केले तेव्हा अनेकांनी केंद्राला वेडात काढले. प्रत्यक्षात हे कलम रद्द झाल्यानंतर खोऱ्याने औद्यागिक प्रगतीकडे वाटचाल सुरू केली. माओवाद निखंदून काढण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रयोगाच्या घोषणेनंतरही साशंक मनांची कोल्हेकुई वाढली. पुढील वर्षी मार्चपर्यंत माओवाद हद्दपार करण्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जाहीर केले आणि ते कामाला लागले. माओवाद्यांची चहुबाजूने कोंडी झाली. अर्थातच, वर्षभरात माओवाद संपणे अशक्य असल्याचीच प्रतिक्रिया आली. खेड्यापाड्यात जाऊन सरपंच, तलाठ्यांच्या हत्या करायच्या, पोलिसी खबरी असल्याच्या संशयावरून भर बाजारात अनेक निष्पापांचे मुडदे पाडायचे, देशाच्या संपत्तीची होळी करायची हे माओवाद्यांचे नित्याचे काम झाले होते. जनमानसातील दहशत कमी होऊ न देण्याच्या व्यूहरचनेतून त्यांनी अव्याहत छळसत्र चालविले. ग्रामीण सूडचक्रासोबतच शहरी भागात अर्बन नक्षलवाद्यांच्या माध्यमातून असत्य कथन दृढ करण्याचीही पद्धतशीर खेळी माओवाद्यांनी यशस्वी केली. सरकारच्या विरोधात रोष निर्माण करून सामान्यांचा दिलासा मिळविण्याच्या त्यांच्या कारस्थानांची काही प्रमाणात सरशी झाली. लोकलढ्याच्या गोंडस नावाखाली, सामाजिक क्रांतीच्या देखण्या आवरणाखाली त्यांनी हजारो निष्पाप युवकांना कह्यात ओढले. आदिवासींची शस्त्रे आदिवासींच्याच विरोधात वापरली. पोलिस हे सामान्य जनतेचे शत्रू असल्याचे चित्र रंगविले. हा अपप्रचार खोडून ग्रामीण जनतेला राष्ट्रीय प्रवाहात आणणे सोपे नव्हते. आधी संवाद, पुढे विकास आणि नंतर संघर्ष अशा केंद्र आणि राज्याच्या संयत धोरणाला आता कुठे यश मिळू लागले आहे. ग्रीन कॉरिडॉरमधील कोंडी दूर करून विकासाच्या योजनांच्या सर्वदूर समन्यायी वाटपाची योजना केंद्राने आखली. राज्यांच्या मदतीने माओवाद्यांचे पुनर्वसन केले. नव्या भारताची भक्कम प्रतिमा केवळ लाभदायी योजनांमुळे नाही, तर नागरिकांमध्ये सुरक्षेबद्दलचा खंबीर विश्वास तयार करण्याच्या प्रयत्नांमुळे रुजली. माओवाद्यांनी प्रामाणिक व्यवस्थेपुढे छिन्नविच्छिन्न लक्तरे टांगली. गृह मंत्रालयाने प्रशासनाचा निश्चय भंगू दिला नाही. माओवादी संघटनांवरील बंदी उठवावी, तुरुंगातील माओवादी नेत्यांची सुटका करावी, माओवादग्रस्त भागातील सुरक्षा तळ बंद करावेत आदी अटी घालून माओवाद्यांनी यापूर्वीही संवादाची शक्यता वर्तविली होती. भाकप (माओवादी) केंद्रीय समितीचा प्रवक्ता अभय याने आता चर्चेच्या पूर्वअटींमध्ये तत्काळ युद्धबंदी आणि सुरक्षा दलांना माघारी बोलविण्याचे आवाहन केले. चारशेहून अधिक माओवादी मारल्याची कबुली दिली. महिला माओवाद्यांवर लैंगिक अत्याचार करून अनेकांना फाशी दिल्याचा त्यांचा आरोप आहे. देशातील सर्वाधिक माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या बाराहून सहावर आली आहे. आता आलेल्या माओवाद्यांच्या प्रस्तावामागे सुरक्षा दलांच्या नियोजनबद्ध प्रयासांचा वाटा आहे. गौण खनिजांच्या व्यवस्थापनासाठी गडचिरोलीत पोहचलेले जिल्हा खनिकर्म प्राधिकरण हा विकासाचा टप्पा आहे. आत्मसमर्पणाच्या प्रस्तावाचे अधोरेखन करून सरकारने कणखर भूमिका घेतली हे महत्त्वाचे. स्पष्ट आणि प्रामाणिक पुढाकाराखेरीज सरकारी कारवाया न थांबविण्याच्या इशाऱ्यातून सरकारी आत्मविश्वास झळकला. ङ्गलिबरल असलो तरी लेचेपेचे नाहीतफ या सरकारी प्रस्तावाला विरोधी पक्षांनीही पाठिंबा द्यावा. शांतता सर्वांनाच हवी आहे

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर समजून घेतांना...

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समजून घेतांना जागृत मेंदु, निपक्ष मन, उपकाराची जान, मनाचा प्रामाणिक पणा, वैचारिक स्वातंत्र्य आणि डोळस वृत्ती सह अजूनही अनेक गोष्टींची गरज आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे नाव नाही क्रांती आहे, परिवर्तन आहे, स्वाभिमान आहे, प्रत्येकांचा मान सन्मान आहे, हक्क अधिकार आहेत. मुक्याचा मूकनायक, महिलांचे उद्धारक, शेतकऱ्यांचे कैवारी, विद्यार्थांचे मुख्य मार्गदर्शक आहेत. परंतु देशातील मुख्य समस्या ही आहे की ज्यांनी ज्यांनी मानवाच्या उद्धाराचे काम केले, विषमता, अंधविश्वास, पाखंड झुगारून समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि विज्ञान दिले अशा महापुरुषांना जातीत बंद करण्याचे कारस्थान येथील कुटील व्यवस्थेने केले. महापुरुषांचे कार्य जनमानसात पोहचु नये यासाठी हि व्यवस्था सतत काम असते. मुळात ज्या लोकांचे अस्तीत्व व पोट विषमता, पाखंड, अंधविश्वास यावरच असेल त्या लोकांना समता, तर्कवाद आणि विज्ञान कसे मान्य होणार? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती संस्था मुळासह नष्ट व्हायला पाहिजे, प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे, प्रत्येक माणसाला माणूस म्हणून सन्मान व्हायला पाहिजे, प्रत्येक माणसाला समान संधी उपलब्ध व्हायला पाहिजे यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले त्याच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना मर्यादित करण्याचे काम येथील व्यवस्था करत आहे. आणि याच व्यवस्थेला पुरक असे काम स्वतः ला आंबेडकरवादी समजणारे नेते, लेखक, गायक व वक्ते करत आहेत. एकतर्फी व एकांगी चुकिची मांडणी करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना माणसापासून दुर करण्याचे या पोटभरू लोकांनी केली, दलितांचे, अस्पश्यांचे उद्धारक, हिंदू धर्म त्यागणारे, देवदेवतांचा विरोध करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर मांडले. परंतु हिंदू धर्मातील प्रत्येक घटकांचा उद्धार करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर मांडण्यात पोटभरू लोकांना अपयश आले. याचे कारण म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना भांडवल बनवून त्यावर भाषण देणे, गाणे गायने किंवा मनोरंजन करणे आणि आपला भोटभरू उद्योग करणाऱ्या लोकांना इतर बाबींवर बोलण्याचा काही अधिकार आहे का? आपण आजची परिस्थिती बघितली तर धर्माला अवास्तव महत्त्व देऊन लोकांना धर्मांध बनवून लोकांच्या मेंदुचा वापर करणे बंद करण्याचे काम केले जात आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना एकाच समुहाचे उद्धारक समजणे हे मानसिक विकलांग लोकांचे काम आहे. एकांगी व चुकिची मांडणी करणारे लोक अल्पबुद्धीचे आहेत. त्यांच्याकडे प्रामाणिक पणा शिल्लक राहिला नाही. संविधानाने सर्वांना समान हक्क अधिकार दिले आहेत. प्रत्येकाला धर्माच्या रुढी परंपराचे पालन करण्याचा अधिकार ही समान आहे. ज्या महामानवांनी प्रत्येक धर्माला व धर्मातील प्रत्येकाला समान अधिकार दिले तो महापुरुष एखाद्या धर्माच्या विरोधात कसा असु शकतो? देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणतात मी चहा विकला, बरेच वर्षे भिक्षा माघुन जिवन जगले, चहा विकणाऱ्या, भिक्षा मागणाऱ्या व्यक्तीला धर्माने नेमकं काय दिले? यावर विचार होणे गरजेचे आहे. डॉ बाबासा हे ब आंबेडकर यांनी चहा विकणाऱ्या आणि भिक्षा माघुन खाणाऱ्या व्यक्तीला देशाचा प्रधानमंत्री बनवले. तर काय मोदी दलित आहेत? नरेंद्र मोदी यांचा उद्धार कोणामुळे झाला? यावर कोणताही स्ट्रीम मिडिया चर्चा करणार नाही. आंबा चोकुन खाता कि कापून खाता हा प्रश्न मिडिया ला महत्त्वाचा वाटतो. महिलांना धर्मग्र थांनी घराची चौकट ओलांडण्याचा अधिकार दिला नाही, घरात पुरुषां अगोदर जेवण्याची अधिकार नसताना महिलांना अधिकारी, राष्ट्रपती, प्रधानमंत्री, व लोकप्रतीधी बनवून सर्वोच्च सन्माना सोबत पुरुषांची सलामी मिळवून दिली हे फक्त दलीतांच्या महिलांनाच आहे का? महिलांना नोकरी, शिक्षण व संपत्ती मध्ये समान हिस्सा मिळवून दिला समान पगार व पुरुषांप्रमाणे समान मताधिकार मिळवून दिला तो फक्त दलीत महिलांनाच का? महिलांना मुल दत्तक घेण्याचा, पुर्नविवाह करण्याचा अधिकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना मिळवून देण्यासाठी आपल्या आयुष्याचे अनेक वर्षे खर्ची घातले याचा फायदा फक्त दलित महिलांनाच आहे का? धर्मग्रंथ व जन्म देणाऱ्या संस्कृती ने मुलीला परकं धन मानून वडील व पती अशा कुठेही आदराचे स्थान दिले नाही. महिलांना सार्वजनिक ठिकाणी सोडा पण मंदिरातही जाण्याचा अधिकार नाकारणारी व्यवस्था मोडीत काढून महिलांना प्रत्येक क्षेत्रात प्राधान्य देऊन उद्धार केला हे फक्त दलितांच्या महिलांना फायदा झाला का? कामगारांचे कामाचे तास, बोनस, पगारवाढ, पेन्शन, पिएफ ह्या सर्व सुविधा केवळ ब ा ब ासा हे ब आंबेडकर यांच्या मुळेच आहेत तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर दलितांचेच उद्धारक आहेत का? जिवन जगताना मिळणारे प्रत्येक सुख हे व उपभोग केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच मिळते तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना फक्त एका गटापुरते मर्यादित करून मांडणी करणे हे माणसिक कमकुवत व बेईमान व्यक्तीचे च लक्षण नाही का? गोठ्यात गाय आणि घरात माय सुरक्षित आहे ती फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे. शेतकरी, विद्यार्थ्यांना ज्या वेगवेगवेगळ्या योजना मिळतात ते केवळ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. सध्या लाडकी बहीण योजनेचा लाभ बहुतांश महिला घेत आहेत हे सुद्धा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. हे सर्व समजून घेण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपकाराची जाण ठेवण्यासाठी माणसाचे विचार व मन स्वच्छ पाहिजे. मन व विचार स्वच्छ नसतील तर सत्य आपण बघु शकत नाही, सत्य वाचु शकत नाही, आणि सत्य पचवू सुद्धां शकत नाही. नरेंद्र मोदी व त्यांच्या मंत्रिमंडळातील जे काही लोकप्रतिनिधी आहेत, मंत्रालयातील सचिव आहेत, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी पदाधिकारी आहेत सर्वच लोकांवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार नाहीत का? जर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रत्येकावर उपकार आहेत तर प्रत्येक जन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना का मानत नाही? का आजही भिमजयंती फक्त बौद्धवस्तीमध्ये साजरी केली जाते? भिमजयंती बौद्ध वस्तीत साजरी होते याचा अर्थ बौद्धांनी बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्विकारले असा होतो का? तर मुळीच नाही. बौद्धांनी अर्थात पुर्वीच्या महारांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर जातीचे आहेत म्हणून स्विकारले. जर खरचं त्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामुळे स्विकारले असते

# महापे येथील राममंदिरात श्री राम जन्मोत्सव उत्साहात साजरा

गणेश हिरवे
मुंबई प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे यंदाही श्री राम नवमी निमित्त नवी मुंबईतील महापे येथील श्री राम मंदिरात किर्तन, भजन, जन्मोत्सव व महाप्रसादाचे आयोजन श्रीराममंदिर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करण्यात आले होते. महापे येथील श्री रामांचे हे मंदिर खूप जुने असून मागील ३४ वर्षांपासून येथे राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. स्वर्गीय श्री अमृत पाटील यांनी सन १९९२ साली सुरू केलेली परंपरा त्यांच्या चंद्रकांत, भगीरथ, प्रभाकर, भानुदास, देविदास ह्या त्यांच्या ५ मुलांनी आजही एकत्रितपणे त्याच उत्साहात सुरू ठेवली आहे. राम जन्मोत्सवानिमित्त दरवर्षी येथे पहाटेपासून दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ग्रामस्थ व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने त्यात सहभागी झाले होते. गेल्या २६ वर्षांपासून गुरुवर्य हभप पांडुरंग महाराज भोईर (आळंदी) यांचे हरिकीर्तन या ठिकाणी श्री राम नवमीच्या दिवशी आयोजित केले जाते. या वर्षीदेखील हभप पांडुरंग महाराजांचे श्री राम जन्मोत्सवावर सुश्राव्य कीर्तन झाले व त्यानंतर दुपारी १२ वाजता जन्मोत्सव साजरा करण्यात आला. श्री रामनवमी या हिंदू सणात भगवान रामाचा सन्मान केला जातो. चैत्र नवरात्रीच्या नवव्या दिवशी राम नवमी साजरी केली जाते. रावणाच्या राजवटीतून जगाला मुक्त करण्यासाठी भगवान रामाची निर्मिती झाली. प्रभू राम त्यांच्या कठोर जीवनशैलीमुळे मर्यादा पुरुषोत्तम राम म्हणून ओळखले जात होते. श्री राम नवमीची थोडक्यात पौराणिक कथा अशी की, त्रेतायुगात दशरथ नावाचा राजा होता, त्यांना तीन बायका (कौशल्या, सुमित्रा आणि कैकेयी) होत्या. ते निपुत्रिक असल्याने भविष्यात अयोध्येवर कोण राज्य करणार याची चिंता त्यांना होती. प्रख्यात ऋषी वशिष्ठांनी त्यांना बालसंतान यज्ञ करण्याचा सल्ला दिला. या



यज्ञप्रदर्शनाची विशेष विनंती ऋषिश्रृंगाने केली होती. यज्ञ संपल्यानंतर त्यांना यज्ञदेवतेकडून पवित्र खीरची वाटी मिळाली. त्यांनी तिन्ही महिलांना वाटीतील पवित्र खीर दिली. काही दिवसांनी खीर खाल्ल्यानंतर सर्व राण्यांना गर्भधारणा झाली. चैत्र महिन्याच्या नवव्या दिवशी दुपारच्या सुमारास कौसल्येने श्री राम यांना, कैकेयीने भरताला आणि सुमित्राने लक्ष्मण आणि शत्रुघ्न नावाच्या जुळ्या मुलांना जन्म दिला. भगवान विष्णूचे सातवे स्वरूप, भगवान राम हे कौशल्येचे पुत्र होते आणि अधर्माचा उच्चाटन करण्यासाठी आणि धर्माची स्थापना करण्यासाठी पृथ्वीवर आले. भगवान रामाने आपल्या अनुयायांना दुष्टांच्या हल्ल्यापासून वाचवताना संपूर्ण पृथ्वीवरील अन्याय दूर करून पृथ्वीवर धर्माची स्थापना केली. त्याने रावणासह सर्व राक्षसांचाही नायनाट केला. अयोध्येतील लोक नवीन राजा मिळाल्याबद्दल आनंदी होते, म्हणून ते दरवर्षी त्यांच्या राजाचा वाढदिवस राम नवमी म्हणून आनंदाने आणि उत्साहाने साजरा करू लागले, ही प्रथा आता भारतभरातील हिंदूंनी पाळली आहे. रामनवमीचा दिवस हिंदूंना खूप महत्वाचा आहे. संपूर्ण भारतभर ही पूजा मोठ्या उत्साहात साजरी करतात. असे असले तरी, ही रामनवमीची पूजा अयोध्येमध्ये, जेथे भगवान श्री राम यांचा जन्म झाला, तेथे मोठ्या धूमधडाक्यात साजरा केली जाते. श्रीराम यांना त्यांच्या जीवनातील चारित्र्यामुळे मर्यादा पुरुषोत्तम हे नाव देण्यात आले. वडिलांच्या आज्ञेनुसार त्यांनी राजवाड्यातील सुखसोयींचा त्याग केला आणि जंगलातील जीवन स्वीकारले. या अर्थाने, हा दिवस साजरा करण्यामागे श्री रामांचे परिपूर्ण, त्यागमय, संघर्ष, मर्यादापूर्ण जीवन, दुष्ट व संहारक प्रवृत्तींना संपवणारे जीवन भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हा देखील उद्देश आहे. श्री राम जन्मोत्सवाच्या निमित्ताने मंदिरात अनेक मान्यवर मंडळींनी उपस्थित राहत प्रभू रामांचे दर्शन घेतले. यावेळी पाटील कुटुंबियांच्या वतीने किर्तनकार व समवेतच्या साथकरी वारकऱ्यांचा सन्मानदेखील करण्यात आला.

# अखेर लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम पुर्णत्वाकडे ; स्मशानभूमीत सरण रचुन केलेल्या ठिय्या आंदोलनाचे यश :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:-( दि.०८ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील १२ ते १४ वर्षापुर्वी बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीचे ढासळलेल्या अवस्थेतील बांधकाम आणि उडुन गेलेले पत्रे यामुळे दुरावस्था झाली होती त्यामुळे पावसाळ्यात अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठी अडचण निर्माण होऊन मृतदेहाची हेळसांड होत होती. नविन स्मशानभूमी बांधण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सहकारी विक्रांत वाणी,कृष्णा वायभट,आरूण ढवळे यांनी ढासळलेल्या बांधकामावरच सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते. त्याची दखल घेत आ.संदिप क्षीरसागर यांनी जिल्हा वार्षिक (दहन/ दहनभुमी) जनसुविधा विशेष अनुदान योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षाकरीता ग्रामपंचायत



लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत प्रशासकीय मान्यता दिली होती. आता काम पुर्णत्वाकडे गेले असुन नविन स्मशानभूमी पावसाळ्यात होणारी मृतदेहाची हेळसांड थांबणार असल्याने ग्रामस्थांनी याबद्दल समाधान व्यक्त केले असुन उर्वरित पेलव्हिक ब्लॉक,पाण्याचा हौद, संरक्षक भिंत आदी कामांसाठी पाठपुरावा करणार आहोत.

मृतदेह तहसील कार्यालयात आणण्याच्या घटनात वाढ; प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना सोयरंसुतक नाही बीड जिल्ह्यातील १३९४ गावातील स्मशानभूमीची दुरावस्था असुन ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोयच नाही. त्यामुळे पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड याबरोबरच अंत्यसंस्कार रोखल्याने गावात वादविवाद होण्याच्या घटना घडत आहेत. काल दि.७ सोमवार रोजी धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण येथील भिल्ल समाजातील संजय नामदेव माळी यांचा मृतदेह धारूर तहसील कार्यालयासमोर ३ तास ठेवण्यात आला होता. यापुर्वीही केज तालुक्यातील सोनेसांगवी( सुर्डी) येथील ४ महिन्यात ३ मागासवर्गीय महिलांचा अंत्यसंस्कार रोखल्याने तहसील कार्यालयात मृतदेह आणुन ठेवला होता.तर गेवराई तालुक्यातील सुशी वडगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर मृतदेह ठेवण्यात आला होता तर बीड तालुक्यातील पालवण याठिकाणी अंत्यसंस्कार रोखल्याने भांडणे होऊन अट्रसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. गेल्या ३ वर्षांपासून आम्ही शासन दरबारी निवेदने तसेच लक्ष्यवेधी आंदोलनाद्वारे स्मशानभूमीची सोय करण्याची मागणी करत आहोत. परंतु प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांना याचे सोयरसुतक नसल्याचे दिसून येते.अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी बोलून दाखवली.

# निसर्ग आणि मानवी मन जोडणारा घाट ! विश्वनाथ पंडित



कशेडी घाटात बोगदा झाला नव्हे ते आवश्यकच होते. इंधनासह वेळेची बचत त्यामुळे होणार आहे हे निश्चित परंतू मानवी मन कुठेतरी गुरफट असतच अगदी त्या प्रमाणे रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना जोडणारा, निसर्ग आणि माणूस यांची जवळीक साधणारा कशेडी घाट होय. ज्याच्या अंगा खांद्यावरून गेली ७०- ७५ वर्ष प्रवास केला, ज्याने निसर्ग आणि मानवी मनाचे मनोमिलन घडवले, साथ सोबत केली, 'वनचरे आम्हां सोयरी' ची खरीखुरी ओळख, नकळत शिकवण दिली, घाटातून जाताना वाहन चालकाला प्रत्येक वेळी नवा प्रवास, नवा आनंद, नवा अनुभव,नवा हर्ष नवी उमेद सातत्याने देत राहिला तो कशेडी घाट मात्र आता विस्मरणात जातोय की काय अशी धास्ती वाटायला लागलीय. संबंधित यंत्रणेने कशेडी घाट, मूळ रस्ता कायमस्वरूपी सुस्थितीत रहावा, तो दुर्लक्षीत राहू नये कारण घाट प्रेमी वाहन चालकांना कशेडी घाटाचा, त्या वळणावळणाच्या नागमोडी रस्त्याचा, तेथील निसर्गाचा, द-या, डोंगरांचा कायमस्वरूपी आनंद घेता यावा म्हणून नव्हे या साठीच हे मनोगत.

विश्वनाथ पंडित,
९५८८४५०४४२

# झालेत गुलाम मोकळे; भिमा तुझ्या जन्मामुळे

बीड । प्रतिनिधी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने बीडमध्ये जयभिम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सोमवार (दि.७) एप्रिल रोजी महापुरुष वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४३ व्या जयंती निमित्ताने बीडमध्ये ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित केला आहे. सोमवारी या महोत्सवात महापुरुष वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला अध्यक्ष डी.जी.वानखेडे तर प्रमुख पाहुणे म्हणून गुलाब भोले सर, डी.एम.राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. जयभिम महोत्सवाने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी मिळाली.यातून त्यांच्या ज्ञानातही भर पडली.त्यआमुळे एक चांगला समाज निर्माण होण्यास ही अतिशय पोषक ठरली आहे.महापुरुष वक्तृत्व स्पर्धांचे परीक्षण ॲड.नितीन वाघमारे,प्रणित सरवदे यांनी केले.महापुरुष वक्तृत्व स्पर्धांचे प्रास्ताविक सुमेध जोगदंड यांनी केले. सूत्रसंचालन सचिन वडमारे,सुनिल डोंगरे तर आभार प्रा.अशोक गायकवाड यांनी केले.

# कोळेश्वरच्या विद्यार्थ्यांनी फुलविली परसबाग सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या भाजीपाल्याचा मध्यान्ह आहारासाठी होतोय वापर

गेवराई : प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील कोळगांव येथील नूतन कोळेश्वर विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी वृक्ष व पक्षी संवर्धनाबरोबरच शाळेतील सांडपाण्याचा पूनरवापर करून शाळेमध्ये रासायनीक खते व औषधांचा वापर न करता नैसर्गिक सेंद्रिय पद्धतीने परसबाग फुलवून विषमुक्त भाजीपाला निर्मिती प्रकल्प तयार केला. दरम्यान या नैसर्गिक सेंद्रिय पद्धतीने फुलविलेला भाजीपाल्याचा शाळेच्या मध्यान्ह आहारासाठी वापर केला जात आहे.

कोळगाव येथील नुतन कोळेश्वर विद्यालयातील विद्यार्थी नेहमीच नवनवीन नाविन्यपूर्ण उपक्रम राबवितात. या शाळेतील विद्यार्थ्यांनी कला शिक्षक किशोर निकम सर यांच्या मार्गदर्शनाखाली उन्हाची तीव्रता वाढताच मागील महिण्यात तहानलेल्या पक्षांसाठी शाळेच्या आवारात असलेल्या झाडावर पाण्याच्या कुंड्या बांधल्या आहेत. यामुळे विविध पक्षांचा शाळेच्या आवारात सतत किलबिलाट पहायला मिळतो. तसेच नवीन वृक्ष भर उन्हाळ्यात देखील संगोपन झाले पाहिजे यासाठी टाकाऊ बाटल्यापासून झाडांना सिंचणाप्रमाणे पाणी



देण्याची सोय करण्यात आली आहे, यामुळे शाळेच्या परिसरातील झाडे भर उन्हाळ्यात देखील हिरवीगार झाली आहेत. या उपक्रमामुळे झाडे लावा, झाडे जगवा यासह पक्षी संवर्धनाची एकप्रकारे विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण झाली आहे. अशाचप्रकारे शाळेतील राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी कला शिक्षक किशोर निकम यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय पोषण आहारसाठी लागणारा भाजीपाला सेंद्रिय नैसर्गिक पद्धतीचा वापर करून शाळेतच पिकवला जातो. या विद्यार्थ्यांनी शाळेतील परसबागेत सध्या टमाटे, मिरची, कोथिंबीर आदी भाजीपाला चांगलाच बहरला आहे. परसबागेत पिकवलेला हा भाजीपाला हा शाळेच्या मध्यान्ह आहारामध्ये वापरला जात आहे. त्यामुळे या सेंद्रिय पिकवलेल्या भाजीपाल्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सदृढ राहण्यास मदत होईल, तसेच सदरील उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये शेतीविषयी आवड निर्माण होत असून या अनोख्या उपक्रमाचे शाळेचे मुख्याध्यापक आर.व्ही.बागलाने व सर्व शिक्षक वृंदानी कौतूक केले.

# साई श्रद्धा सेवा संस्थेच्या वतीने श्रीराम नवमी उत्सवाचा भव्य सोहळा; १० मान्यवरांना डोंबिवली सन्मान पुरस्काराने गौरव...!

डोंबिवली(प्रतिनिधी गुरुनाथ तिरपणकर) साई श्रद्धा विविध कार्यकारी सेवा संस्था, डोंबिवली यांच्या वतीने श्रीराम नवमी २०२५ निमित्ताने आयोजित करण्यात आलेला पंधरावा वार्षिक उत्सव अत्यंत उत्साही आणि भाविकांच्या सहभागाने पार पडला. यानिमित्त साईबाबांच्या पालखीची भव्य मिरवणूक, साईबाबांचे दर्शन सोहळा तसेच साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात सर्व महिलांना हळदीकुंकू वाटप करून गुलाब पुष्प देण्यात आले. यावेळी पंचवीस महिला बचत गटांच्या सदस्यांचा कौटुंबिक मेळावा आयोजित करण्यात आला होता. परिसरातील साई भक्त आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हजार ते दीड हजार लोकांनी साई महाप्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डोंबिवलीकरांचा "डोंबिवली सन्मान" या विशेष पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रासाठी डॉ. अमित लोखंडे, पत्रकारिता क्षेत्रातील आकाश गायकवाड, आरोग्य सेवेसाठी डॉ. सचिन बोंडे, आदिवासी विद्यार्थ्यांच्या



विकासासाठी वंदना बोरकर, गरजू मुलांना अल्पदरात लस उपलब्ध करून देणारे कल्पेश सावंत, रोजगारनिर्मिती व बांधकाम क्षेत्रातील ज्ञानेश्वर दळवी, सामाजिक कार्यातील एकनाथ म्हात्रे, उद्योग क्षेत्रातील राम आणि लक्ष्मण म्हात्रे बंधू आदी अशा दहा मान्यवरांचा समावेश होता. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार, लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते गुरुनाथ तिरपणकर, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखाधिकारी रश्मी घोडविंदे, घे भरारी लोकसंचालित साधन केंद्राच्या मॅनेजर रोहिणी शिंदे, नवचैतन्य लोकसंचालित साधन केंद्राच्या अंजली परब, बँक ऑफ महाराष्ट्रच्या सविता पावसकर यांची उपस्थिती होती. तसेच डोंबिवलीचे नगरसेवक विकास म्हात्रे, कविता म्हात्रे, प्रकाश भोईर, सरोजिनी भोईर, जनसेवक बाळा म्हात्रे, अनमोल म्हात्रे, शिवसेनेचे हरिश्चंद्र पाटील आणि विलास म्हात्रे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष कैलास सणस, कार्याध्यक्ष प्रवीण (पऊ) साळवी, कार्यकारिणी सदस्य विजय भोईर, उदय सावंत, संघटिका व खजिनदार ज्योती उबाळे, मंगल पांचाळ, मयुरी गायकर, तृप्ती चौव्हाण, अलका सूर्यवंशी, पूजा दुधाळ, कार्यकारी सदस्य प्रकाश उबाळे, संदीप दरेकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालनाची जबाबदारी पुनम खंदारे आणि पूजा दुधाळ यांनी पार पाडली. या कार्यक्रमामुळे डोंबिवलीतील सामाजिक, शैक्षणिक व उद्योग क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचे योगदान अधोरेखित झाले असून, नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# जिल्हा शास्वत विकास मंथनासाठी गुरूवारी बैठक

बीड । प्रतिनिधी अप्रतिम महावक्ता - पब्लिक टॅलेंट रियालिटी शो सिरीज २०३२ शाश्वत विकास ध्येयाच्या दिशेनेफ) या पत्रकारांच्या पुढाकारातून राबवयाच्या कार्यक्रम मालिकेअंतर्गत साहित्यिका व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रशासनातील अधिकारी व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत बीड जिल्हा शाश्वत विकास मंथन बैठकीचे दि. १० एप्रिल २०२५ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, विधी व न्याय क्षेत्रातील मान्यवरांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले असुन पत्रकारांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी बैठकीस उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक दिलीप खिस्ती, समन्वयक विशाल साळुंके, अनिल जाधव यांनी केले आहे. शहरातील केएसके महाविद्यालयाच्या सभागृहात सदरील बैठकीचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील राजकीय, शासकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, पर्यावरण, उद्योग व्यापार यासह विविध क्षेत्रातील संस्था तसेच युवा वर्ग, महिला संघटना व नागरिकांच्या सांघिक सहकार्यातून प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व नव माध्यमातील पत्रकार आगामी काळासाठी विशेष उपक्रम राबविणार आहेत. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्थातच राजकीय व सर्व क्षेत्रातील सामाजिक संस्थांचा आणि मुख्य म्हणजे शासकीय, निम शासकीय अधिकार्यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. बैठकीमध्ये ज्येष्ठ पत्रकार डॉ. अनिल फळे हे सदर कार्यक्रम मालिकेबद्दल सादरीकरण करतील. त्या सादरीकरणाच्या अनुषंगाने आपल्या सूचना व सहकार्य लक्षात घेऊन बीड शहर

# श्रीरामरक्षा म्हणजे आत्मबलाचा स्तोत्र - प्रज्ञाताई पंडित

श्रीरामनवमीच्या पावन पर्वानिमित्त जेजुरीकर श्रीराम मंदिराच्या वतीने आयोजित करण्यात आलेले ठाण्याच्या सुप्रसिद्ध निरूपणकार सौ. प्रज्ञाताई पंडित यांचे 'श्रीरामरक्षा – भक्ती, शक्ती आणि मुक्ती' हे विशेष प्रभावी आणि हृदयस्पर्शी निरूपण धार्मिक निरूपण शनिवार, ५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता भक्तिभावात संपन्न झाले.

त्यांच्या ओघवत्या वाणीने आणि शास्त्राधारित विवेचनातून उपस्थित भक्तांना भक्ती, आत्मबल आणि आध्यात्मिक



मुक्तीचा नवा मार्ग मिळाला. श्रीरामरक्षेतील मंत्रसामर्थ्य आणि भक्तांच्या जीवनातील त्याचे महत्व त्यांनी सहज आणि समर्पक शब्दांत मांडले. या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन जेजुरी येथील श्री क्षेत्र जेजुरी*च्या *जेजुरीकर श्रीराम मंदिराचे विश्वस्त श्री. म्हाळसाकांत नारायण आगलावे - जेजुरीकर, श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी आणि त्यांचा परिवार यांनी केले होते. या कार्यक्रमात श्री मार्तंड देवस्थानचे विश्वस्त डॉ राजेंद्र खेडेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे समन्वयन श्री राम मंदिर सदस्य ॲड. मंगेश जेजुरीकर यांनी समर्थपणे पार पाडले. कार्यक्रमास जेजुरी परिसरातील विविध भागातून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी प्रज्ञाताईंनी दिलेल्या आध्यात्मिक मार्गदर्शनाचा भरभरून लाभ घेतला. आयोजकांकडून सर्व भाविकांचे आभार मानण्यात आले.

# स्वयंपाकाचा गॅस महागला



पेट्रोल डिझेलच्या उत्पादन शुल्कावर दोन रुपयांची वाढ केल्यावर केंद्र सरकारने स्वयंपाकाचा सिलेंडर ५० रुपयांनी वाढविला असून पूर्वी ८०२.५० रुपयांना मिळणारा गॅस आता ८५२.५० रुपयांना मिळणार असल्याचे गृहिणी जाम संतापल्या आहेत. आधीच महागाई देखील दिवसेंदिवस वाढत आहे. रोजचा भाजीपाला कांदे यांच्या किमती वधारलेल्या आहेत. त्यातच आता गॅस महागल्याने आर्थिक तरतूद कशी करायची या विवंचनेत गृहिणी आहेत. पेट्रोल डिझेल गॅस या नियमीत लागणाऱ्या वस्तू असून त्याची किंमत निदान ५ वर्षासाठी स्थिर असायला हवी असे सर्वसामान्य नागरिकांचे म्हणणे आहे.

गणेश हिरवे

# राज्यगीत ऐकणे अभिमानच

राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्वच शाळांमध्ये जय जय महाराष्ट्र माझा... गर्जे महाराष्ट्र माझा हे गीत वाजविणे बंधनकारक असल्याच्या शासन निर्णय फडणवीस सरकारने नुकताच जाहीर केला असून येत्या जून पासून नवीन शैक्षणिक वर्ष २०२५/२६ सुरू झाले की सर्वत्र जे गीत धूमधडाक्यात वाजविण्यात येईल.या गीताला १ फेब्रुवारी २०२३ पासून राज्य गीताचा दर्जा प्राप्त झाला असून याचा अभिमान सर्च मराठी लोकांबरोबरच राज्यात राहणाऱ्या सर्वांनाच असायला हवा.हे गीत स्फूर्तिदायक आणि आवेशपूर्ण असून यातून महाराष्ट्राची संस्कृती आणि सौंदर्य उलगडले आहे.महाराष्ट्र ही साधू संतांची, गड किल्याची, नद्यांची, थोरांच्या कार्याची भूमी आहे.शाळेच्या पार्थने सोबतच आता ही गीत सकाळ आणि दुपार सत्रात वाजविले जाणार असल्याने एक नवा जोश सर्वांच विधार्थी शिक्षकांच्या अंगात संचारला जाईल हे नक्की.

गणेश हिरवे
जोगेश्वरी पूर्व


# साक्षगंध कार्यक्रम




श्री.पुरुषोत्तम महाराज हिंगणकर यांचे द्वितीय चिरंजीव श्री धर्मराज उर्फ सागर आणि सतीश सावंत यांची द्वितीय कन्यारत्न कु. ऋतिका सतीश सावंत यांचा साक्षगंधाचा कार्यक्रम श्री सतीश सावंत यांचे राहते घरी भोसरी पुणे येथे रविवार दि ६, एप्रिल, २०२५ रोजी संपन्न झाला तेव्हा मुलाचे मामा श्री विठ्ठलराव जवंजाळ वं मुलीचे मामा श्री संतोष तळोले यांचे शुभ हस्ते सुपारी फोडण्याचा कार्यक्रम संपन्न झाला तेव्हा मुली कडील आई वडिलांसह सर्व नातेवाईक वं मुला कडील सर्व घरातील मंडळी नातेवाईक हजर होते.

# अवघड लिहिणार्यांना महान म्हणण्याची परंपरा रूढ होतेय

पुणे : वाचकांना गृहित धरून अवघडातले अवघड लिहिणाऱ्यांना महान म्हणण्यांची विचित्र परंपरा साहित्यात सुरू झाली आहे. ही परंपरा साहित्य व्यवहाराच्या ऊन्नतीसाठी योग्य नाही. असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. केशव देशमुख यांनी व्यक्त केले. लेखक दिनेश फडतरे संपादित 'झांजर' या गुढीपाडवा विशेषांकाचे व 'रँडम' या ललित लेखसंग्रहाचे प्रकाशन डॉ. देशमुख यांच्या हस्ते नवी पेठेतील पत्रकार भवनात झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन लेखक देवा झिंजाड, संस्कृती प्रकाशनाच्या प्रमुख सुनीताराजे पवार, लेखक दिनेश फडतरे उपस्थित होते. डॉ. देशमुख म्हणाले, सर्व प्रकारचे लेखक लेखन करताना आपण कोणासाठी लिहित आहोत. आपला वाचकवर्ग कोण आहे. याचा विचारच करत नाहीत. खरे तर अवघड आणि बोजड लिहिण्यापेक्षा तेच लिखान साध्या, सरळ आणि सोप्या भाषेतही लिहिता येते. जे लिखान साधे, सोपे असते ते हृदयाला अधिक भिडते. वाचकांना लेखक आपला वाटला पाहिजे. त्यामुळे लिखानाची क्रिया घडण्याआधी लेखकांनी वाचकांचा विचार करून लिहिले पाहिजे, असेही डॉ. केशव देशमुख यांनी सांगितले.



देवा झिंजाड म्हणाले, वाचन चळवळीला गती देण्यासाठी साधे-सोपे लिहिणारे लोक अधिक प्रमाणात लिहिते झाले पाहिजेत. बोजड साहित्यामुळे वाचक साहित्यापासूद दर चालले आहेत. चांगल्या साहित्याची निर्मिती करून वाचकांना साहित्याकडे वळविण्याचे काम लेखकांचे आहे. साहित्यात कंपूशाही आहे. कंपूशाहीमुळे बऱ्याच वेळा चांगली पुस्तके मागे पडतात. अस्सल साहित्यिक समाज माध्यमांवर सापडत नाहीत. समाज मादध्यमांवर लाईक्स, कमेंटवाल्याचा भरणार असल्याचेही देवा झिंजाड यांनी सांगितले. सुनीताराजे पवार म्हणाल्या, लेखक तटस्तपणे भूमिका उभी करतो. ललित गद्य ही फार अवघड गोष्ट आहे. ललित गद्याचा विषय सहज सापडत नाही. पुस्तके ही आपली समृद्धी आहे. त्यामुळे पुस्तकांचे जतन झाले पाहिजे. दिनेश फडतरे यांनी प्रास्ताविक केले. वैशाली मोहिते यांनी सुत्रसंचालन केले. ऋचा बोंद्रे-पवार यांनी गायन सादर केले.

फोटो, इंटरनेट, देशमुख ओळ : 'झांजर' गुढीपाडवा विशेषांकाचे व 'रँडम' या ललित लेखसंग्रहाचे प्रकाशन डॉ. केशव देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी देवा झिंजाड, सुनीताराजे पवार, दिनेश फडतरे उपस्थित होते.

---------------

# अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाचे साहित्य संमेलन खेड/तालुका/राजगुरुनगर येथे संपन्न झाले

काल म्हणजे पाच एप्रिल ला अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाचे साहित्य संमेलन खेड/तालुका/राजगुरुनगर येथे संपन्न झाले, त्या कवी संमेलनाचा मी अध्यक्ष होतो मला गर्व आहे की एका क्रांतीवीराच्या गावात मला साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होण्याचा मान मिळाला, राजगुरू हे तेच ज्यांनी देशाच्या स्वतंत्र्याकरिता ब्रिटिशांच्या विरोधात बंड पुकारले आणि देशाच्या स्वतंत्र्याकरिता फाशीवर चढले, अशा क्रांतिवीराच्या गावात म्हणजे राजगुरुनगर येथे, हा साहित्य संमेलनाचा सोहळा पार पडला, त्या संमेलनामध्ये नामावंत लोकांना पुरस्कार देण्यात आले व प्रत्येक साहित्यिकांनी कवींनी आपले आपले उत्तम प्रदर्शन केले, हा साहित्यिकाचा सोहळा घडून आणणारे राजगुरुनगरचे, सतत पंचवीस वर्षे सरपंच पद भोगलेले बापू घुमटकर यांनी या कार्यक्रमाला मोलाचा हातभार लावला बापू तुमचे कौतुक करावं तेवढे थोडे आहे तुमचा सत्कार पाहून मी दंग झालो आणि त्या सतकारामधूनच तुमच्या कारकीर्दीचा मला अंदाज लागला,*बापू कबीर म्हणतात ऐसी करनी कर जो जगह हसे हम रोये,/ऐसी करनी मत कर जो जग रोये हम हसे ,, सर्वच राजगुरुनगरच्या लोकांनी साहित्य संमेलनामध्ये मदतीचा हात लावला आणि साहित्य संमेलन यशस्वी करून दाखवलं त्यामध्ये बापू तुमच्या पुत्र वधू तारिका मॅडम अर्थात आमच्या सर्वांच्या



ताई यांनी सुरू पासून तर शेवटपर्यंत स्टेजवर बसून कवितेचा साहित्याचा आनंद घेतला आणि बापू तुम्ही पण शेवटच्या कवीला एकेपर्यंत थांबला त्याबद्दल तुमचे पुन्हा अभिनंदन करतो आणि बापू तुम्हाला दीर्घ आयुष्य लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना करतो खरोखर तुम्ही मानाचे सन्मानाचे मुलाचे आणि तोलाचे आहात हे मला राजगुरुनगर मध्ये आल्यानंतर कळाले तसेच शिंदे साहेबांनी पण फार मोलाचे कार्य केले आणि हा साहित्याचा योग घडून आणला त्याबद्दल त्यांचे पण आभार अन्नपाणी भरपूर होते, हे त्यांनाच जमते ज्यांच्या हृदयात ईश्वर नांदते, सूत्रसंचालन करणाऱ्या दोन्ही ताईंना माझा नमस्कार फार छान सूत्रसंचालन केले प्रतिभाताई आपण उशिरा निघालात आणि वेळेवर पोहोचला त्याबद्दल तुमचे अभिनंदन, सर्व साहित्यिकांना प्रेक्षकांना माझा मानाचा मुजरा आपण या कार्यक्रमाला यशस्वी केली त्याबद्दल डॉक्टर जयप्रकाश घुमटकर मराठी साहित्य मंडळ अध्यक्ष साहित्यिक लेखक व प्रबोधनकार साहेबांच्या वतीने व माझ्या वतीने सर्वांचे आभार व्यक्त करतो आणि थांबतो माजी सैनिक तथा साहित्यिक कवी डी आर बांगर वादळ वारा मराठी साहित्य मंडळ तालुका अध्यक्ष लोणार बुलढाणा,

देविदास बांगर

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निम्मित भव्य मिरवणुकीचे आयोजन




बीड - भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगभरात मोठ्या उस्ताहात साजरी होते. त्या अनुषंगाने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती निम्मित बीड शहरात भव्य मिरवणुकीचे मोठ्या जल्लोषात मोठ्या उस्ताहात साजरी करण्याचे आयोजन महाप्रजापती बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने केले आहे. बीड शहरात प्रामुख्याने महाप्रजापती बहुउद्देशीय सामाजिक संघटने कडून गेले २१ वर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मोस्तव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येतो. यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुकी सह विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या मध्ये रक्तदान शिबिर,आरोग्य शिबिर व अन्नदान या सारखे कार्यक्रम संघटनेच्या वतीने योजले आहेत. १४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्यास अभिवादन करुन दु.४ वाजता गणेश नगर येथुन भव्य मिरवणुक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याकडे मार्गस्थ होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निम्मित भव्य मिरवणुकीत मोठ्या संखेने उपस्थित रहा असे आवाहन संघटनेतील सर्व सभासदांनी केले आहे. तसेच १४ एप्रिल हा दिवस सुवर्ण महोत्सव म्हणुन साजरा करा असे आवाहन महाप्रजापती बहुउद्देशीय सामाजिक संघटनेचे प्रमुख मार्गदर्शक युवा नेते अथर्व यांनी केले आह

# राज्य मंत्रिमंडळाचे ९ मोठे निर्णय, आता घरांसाठी फक्त कृत्रिम वाळू, झोपडपट्टी पुनर्वसनासाठीही महत्त्वाची सुधारणा!

आज (8 एप्रिल) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यातील काही निर्णयांबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली आहे. त्यांनी सांगितल्यानुसार आता राज्यभरातील घरकुलांसाठी 5 ब्रासपर्यंत मोफत वाळू मिळणार आहे. तसेच शिंधी समाजाला त्यांची घरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठाने कायदेशीर करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. ते आज मुंबईत माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.राज्यातील घरकुलांना आपण पाच ब्रास मोफत वाळू देणार आहोत. प्रत्येक वाळूघाटात 10 टक्के आरक्षण हे घरकुलांसाठी असेल. ज्या ठिकाणी पर्यावरण मंजुरी नाही, त्या ठिकाणी स्थानिक ग्रामपचायती यांनीही पुढची कारवाई कारवाई करायची आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले आहे.

सरकारी बांधकामात एम सँडचाच वापर होणार तसेच, नैसर्गिक वाळू देण्याचं धोरण पुढच्या कॅबिनेटमध्ये आणणार आहोत.. एम सँड म्हणजे कृत्रिम वाळू तयार करण्यात येईल. सरकारी बांधकामात एम सँड वाळूच वापरली जाईल. नदीच्या वाळूची गरज पडणार नाही. एम सँड धोरण पुढच्या कॅबिनेटमध्ये आणले जाईल. दगड आणि गिट्टीपासून ही वाळू तयार केली जाणार आहे, अशी माहितीही चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.सिंधी समाजाला घरे आस्थापना अधिकृत करता येतील“1947 साली फाळणीत जे विस्थापित झाले, अशा सिंधी समाजाच्या राज्यात 30 वसाहती आहेत. नागपूर, जळगाव, मुंबई इथे या वसाहती आहेत. त्या कायदेशीर नाहीत. या सिंधी विस्थापितांसाठी विशेष धोरण आणले आहे. ज्यावेळी जमीन घेतली,



त्यावेळचे रेडी रेकनर दर व 10 टक्के इतर कर लावले जातील. या सर्व वसाहती क्लास वनमध्ये बदलण्यात येतील. आम्ही निवडणूक संकल्पनाम्यात हे वचन दिले होते, ते आज पाळले आहे. आजपासून सिंधी समाजाला ही घरे व आस्थापना अधिकृत करता येतील. त्यासाठी सिंधी समाज ज्यादिवशी विस्थापित झाला त्यावेळचा रेडी रेकनर दर, अडीच टक्के कर लावला जाईल, अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली. मंत्रिमंडळात अन्य कोणकोणते निर्णय झाले? 1) नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतील शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणार, यातून विकास कामांना वेग येणार (नगर विकास) 2) राज्याचे वाळू- रेती निर्गती धोरण-2025 जाहीर (महसूल) 3) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम-१९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय; झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार (गृहनिर्माण) 4) वांद्रे रिक्लेमेशन व आदर्श नगर (वरळी) या दोन म्हाडा अभिन्यासातील इमारतींचा C&DA मार्फत एकत्रित पुनर्विकास करण्याचा निर्णय (गृहनिर्माण) 5) सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करण्यासाठी धोरण विशेष अभय योजना-2025 (महसूल) 6) नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्यात येणार (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन) 7) खाजगी अनुदानित आयुर्वेद व खाजगी अनुदानित युनानी संस्थांमधील गट-ब, क व ड संवर्गातील शासन मंजूर पदावरील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वलक्षी प्रभावाने एक व दोन लाभांची ‘सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना’ लागू करण्याचा निर्णय (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये) 8) शासकीय आयुर्वेद / होमिओपॅथी / युनानी / योग व निसर्गोपचार महाविद्यालयांतील कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर भरावयाच्या अध्यापकांचे दरमहा एकत्रित ठोक मानधन निश्चित (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये) 9) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा (ग्रामविकास)

## अथक परिश्रमाने पूर्ण केले एमबीबीएसचे शिक्षण

बीड डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या आणि कठोर मेहनत घेतलेल्या मनीषा शामराव शिंदे या विद्यार्थिनीने एमबीबीएस पदवी मिळवत मोठे यश संपादन केले आहे. तीच्या या उज्वल यशाबद्दल कुटुंब, मित्रपरिवार आणि शिक्षकांकडून तीचे भरभरून कौतुक केले जात आहे. मनीषाने आपल्या शालेय शिक्षणाच्या काळापासूनच वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे ध्येय ठरवले होते. तीने बारावीमध्ये विज्ञान शाखेत उत्तम गुण मिळवून वैद्यकीय प्रवेश परीक्षा (छएएढ) मध्ये उत्कृष्ट यश मिळवत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव मध्ये प्रवेश मिळवला. तीच्या पाच वर्षांच्या कठोर मेहनती आणि समर्पणामुळे तीने एमबीबीएस अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. तीचे या यशाबद्दल पालक शामराव उत्तमराव शिंदे यांनी आनंद व्यक्त करताना सांगितले की, आमच्या मुलीने डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे, याचा आम्हाला अभिमान वाटतो. तीने अथक मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. मनिषाने सांगितले, एमबीबीएस पूर्ण केल्यावर डॉ. ही उपाधी लागणे ही केवळ एक शैक्षणिक उपलब्धी नसून, ती एक जबाबदारीही आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न मी शालेय जीवनापासून पाहत होते. आज ते स्वप्न पूर्ण झाले आहे, याचा अभिमान वाटतो. हा प्रवास सोपा नव्हता, पण इच्छाशक्ती, मेहनत आणि कुटुंबीय व गुरुजनांच्या पा भठब्यामुळे मी यशस्वी झाले. शालेय शिक्षण संपल्यानंतर मी छएएढ परीक्षेची तयारी केली. सतत अभ्यास, अपयशावर मात करण्याचा निर्धार आणि योग्य मार्गदर्शन यामुळे मी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवू शकले. एमबीबीएसच्या पहिल्या वर्षी शरीरशास्त्र, जैवरसायनशास्त्र आणि शरीरक्रियाशास्त्र यांचा अभ्यास करताना कठीण वाटले, पण हळूहळू अभ्यासाची गोडी लागली. एमबीबीएस हा अभ्यासक्रम केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून नाही, तर



प्रत्यक्ष रुग्णांशी संवाद साधून शिकण्याची संधी यामधून मिळते. हॉस्पिटलमधील क्लिनिकल रोटेशन, इंटर्नशिप आणि रुग्णसेवेचा अनुभव घेताना मी डॉक्टरची खरी जबाबदारी समजून घेतली. अनेकदा थकव्यामुळे मरगळ येत होती, पण रुग्णांचे मनःपूर्वक धन्यवाद हेच माझ्या मेहनतीचे फळ होते. माझे स्वप्न केवळ एमबीबीएसपर्यंत मर्यादित नाही. मला पुढे एमडी करून एखाद्या विशिष्ट शाखेत निपुणता मिळवायची आहे. मी ज्या समाजात वाढले, त्याच समाजासाठी काहीतरी करायचे आहे. गरीब व गरजू लोकांसाठी चांगल्या आरोग्यसेवेची सुविधा उपलब्ध करून देणे हे माझे ध्येय आहे. हा संपूर्ण प्रवास मला शिकवणारा ठरला. मी डॉक्टर झाले असले तरी शिक्षण अजून संपलेले नाही. मनीषाने यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक, नातेवाईक आणि शिक्षण कार्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य आणि मार्गदर्शन करणाऱ्यांना दिले. तीने सांगितले, हे यश मी एकटीने मिळवलेले नाही. माझ्या कुटुंबाने मला सतत प्रोत्साहन दिले, शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन केले आणि शिक्षण कार्यात अनेकांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य व मदतीचा हात दिला. मी माझे वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून समाजासाठी रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा - या तत्त्वावर मी सदैव कार्यरत राहीन! चांगला डॉक्टर होण्याचा प्रयत्न करणार आहे. तीला पुढील प्रवासासाठी अनेकांनी शुभेच्छा दिल्या असून, वैद्यकीय क्षेत्रात तीचे भवितव्य उज्ज्वल होवो, अशी प्रार्थना केली जात आहे.

## सरस्वती नदीवर अतिक्रमण करणाऱ्या २५ जणांना नगर परिषदेकडून नोटीस

परळी : बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या धार्मिक इतिहासात मोठे महत्व असलेल्या सरस्वती नदीला अतिक्रमणाने घेरले असुन अंबेवेस भागात एका भुमाफियाकडुन सुरु असलेल्या अतिक्रमण ठिकाणास भेट देवुन सदरील अतिक्रमण काढावे व सरस्वती नदीला मोकळे करावे अशा सूचना राज्याच्या पशु संवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी भेट दिल्यानंतर न. प. प्रशासनाने २५ जणांना नोटीसा देत कारवाईची पाऊले उचलली आहेत. बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या मंदिरासमोरुन वाहत असलेल्या शहरातुन अडीच किलोमीटर वाहणार्या सरस्वती नदीला अतिक्रमणाने घेरले आहे. ५० ते ६० फुटांचे नदीचे पात्र १५ फुटांवर आल्याने पुराचा धोका वाढला आहे. गतवर्षीच्या पावसाळ्यात पुरस्थिती निर्माण होवुन अंबेवेस, कृष्णानगर, तु ळजानगर, बरकतनगर, गंगासागर नगर, किर्ती नगर आदी भागातील नागरीकांच्या घरात पाणी शिरले होते. अंबेवेस भागात एका भुमाफियाने अतिक्रमण करत नदीपात्रात खोदकाम करत असलेल्या ठिकाणी मंत्री पंकजा मु ंडे यांनी दि.४ एप्रिल रोजी अचानक भेट देत सदरील नदीपात्रातील अतिक्रमण काढावे, कचरा साफ करावा अशा सूचना केल्यानंतर नगरपालिका प्रशासन खडबडून जागे झाले आहे. नदीपात्र मोकळे करण्यासाठी २५ अतिक्रमण धारकांना नोटीसा देत अतिक्रमण काढण्याच्या सुचना दिल्या आहेत

## चौसाळा येथे शिवलीला ताई पाटील यांचे कीर्तन

चौसाळा : येथील चंदन शहावली या देवस्थानचा उरूस निमित्त शिवलीला ताई पाटील विश्व माऊली अध्यात्मिक मुलीची वारकरी शिक्षण संस्था यांचे दिनांक ०९/०४/२०२५ रोजी बुधवारी रात्री ०९ ते १२ दरम्यान हरी कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे तरी सर्व भाविकांनी या कीर्तनाचा अवश्य लाभ घ्यावा अशे आव्हान चौसाळ्याचे सरपंच उपसरपंच तथा कमिटीचे अध्यक्ष सदस्य यांच्यासह नागरिकांनी केले आहे



## धार्मिक संस्कार नसतील तर शिक्षण व्यर्थ

### भगवान गडाचे ह.भ.प. आशिष महाराज बडे शास्त्री; धर्मापुरी येथे अखंड हरिनाम सप्ताह थाटात प्रारंभ

परळी / प्रतिनिधी भारतीय संस्कृतीत साधुसंतांनी सप्ताह, उत्सव सोहळे सुरू केले. त्यामागे धार्मिक कारण होते. धार्मिकतेतून जीवन कसे जगावे याचा उपदेश केला जात होता. संतती संस्कारी व्हावी, त्यांना धर्म कळावा हा यामागचा उद्देश होता. पण हल्लीच्या काळात डॉक्टर-इंजिनियर झालेली मुले परदेशात जाऊन आई-वडिलांना विसरतात व त्यांच्या अंत्यसंस्काराचा विधी व्हिडिओ कॉलवरून उरकतात. म्हणून अध्यात्माचे संस्कार नसतील तर अशा उच्च शिक्षणाचा उपयोग काय? असा मौलिक उपदेश भगवान गडाचे हभप आशिष महाराज बडे शास्त्री यांनी केला. परळी तालुक्यातील धर्मापुरी येथे श्री रोकडेश्वर जागृत देवस्थान मंदिराचा जीर्णोद्धार समस्त ग्रामस्थांनी लोकसहभागातून केला आहे. यानिमित्त श्रीराम नवमी दिनी अखंड हरिनाम सप्ताह व हनुमान-शिव महापुराण कथा सुरू करण्यात आली आहे. या सप्ताहाची सुरुवात मोठ्या थाटामाटात झाली आहे, असे सांगून आशिष महाराज म्हणाले, चराचरामध्ये ईश्वर सामावलेला आहे. ज्यावेळी अशी भावना तयार होईल की चराचरात ईश्वर आहे त्यावेळी प्रत्येक माणसाच्या अंतर्मनात द्वेष राहणार नाही. आज आपण शुक न



पाहणाऱ्या जनसमुदायात राहतो. अशा काळात धर्मापुरी येथील युवा पिढी व ग्रामस्थांनी श्री रोकडेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार केला आणि या मंदिराचा उत्सव श्रीराम नवमी निमित्त आरंभीला हा मोठा स्तुत्य उपक्रम आहे. भगवंताला भक्तप्रिय असतात. हनुमान तर सर्वश्रेष्ठ भक्त आहे. म्हणूनच प्रभू श्रीरामापेक्षा हनुमानाची मंदिरे अधिक आहेत. साधुसंतांनी सप्ताह ठेवले. कारण संतती संस्कारी व्हावी, त्यांना धर्म कळावा, धार्मिक तेथून जीवनाचा अर्थ काढावा, आई-वडिलांचे महात्मे कळावे म्हणून अध्यात्म आवश्यक आहे. अध्यात्माचे संस्कार नसतील तर शिक्षणाचा काहीही उपयोग नाही. कारण हल्लीच्या काळात मुलगा अमेरिकेत व इतर देशात स्थायिक झाला आणि इकडे आई-वडिलांच्या अंत्यसंस्काराला तो येऊ शकत नाही. अंत्यसंस्काराचे व्हिडिओ कॉल करून विधी उरकतो, असे सांगताना आशिष महाराज बडे यांनी डॉक्टर, इंजिनिअर, उच्चपदस्थ अधिकारी झाला पण संस्कारी नाही तर काय उपयोग? त्यासाठी अध्यात्माचे संस्कार आवश्यक आहेत, असा उपदेश केला. अध्यात्माच्या संस्काराचे महात्मे आशिष महाराजांनी महाभारतातील रणांगण भूमीत श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेल्या ङ्कङ्ककर्माचे सारङ्कङ्क याद्वारे स्पष्ट करून सांगितले.शरद काणेकर, सूर्यप्रकाश आगरवाल, खुशबू आगरवाल यांनी संयोजनात परिश्रम घेतले. प्रदीप गांधलीकर यांनी सूत्रसंचालन केले. शाम राव सरकाळे यांनी आभार मानले .

# सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात हायकोर्टाने याचिका स्वीकारली: प्रकाश आंबेडकरांनी मांडली बाजू

परभणी : परभणी येथे न्यायालयीन कस्टडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात सोमनाथ यांच्या आईने हायकोर्टात एक याचिका दाखल केली आहे. हायकोर्टाने ही याचिका स्वीकारली असून पुढील सुनावणी २९ एप्रिल रोजो होणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, सूर्यवंशी यांच्यातर्फे वंचितचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर स्वतः वकील म्हणून हायकोर्टात उभे होते. याचिकेबाबत अ‍ॅड. आंबेडकर म्हणाले की, सध्या न्यायालयीन कोठडीत मृत्यू प्रकरणात मॅजेस्टिक चौकशी करावी एवढीच नियमावली आहे. पण त्यानंतर पुढील कारवाई कोणी करावी, कोणी निर्णय घेयचा, कसा निर्णय घेयचा याबाबत कायदा अपूर्ण आहे. यामुळे कोर्टाला आम्ही सांगितले की, सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू न्यायालयीन कोठडीत झाला आहे. आता पुढील कारवाईसाठी पार्लमेंट पूर्ण कायदा करत नाही तोपर्यंत कोर्टाने नियमावली करावी. आमचे म्हणणे कोर्टाने मान्य केले आहे. याबाबत शासनाला नोटिस देण्यात आली आहे. तसेच सूर्यवंशी प्रकरणात




एसआयटी नेमावी. पण कोर्टाच्या अधिकारात या एसआयटीने काम करावे अशी मागणी केली आहे. या याचिकेवर आता २९ एप्रिल रोजी पुढील सुनावणी असल्याचे अ‍ॅड. आंबेडकर यांनी सांगितले. राज्य सरकार आरोपीच्या पिंजऱ्यात याचिकेतून प्रतिवादी राज्य सरकारला केले आहे. बदलापूर प्रकरणासारखेच परभणी प्रकरणात राज्य सरकारच आरोपी आहे. त्यामुळे राज्य सरकार आरोपी असून त्यांच्याकडून याचिकाकर्त्यांने आणि कोर्टाने अपेक्षा ठेवता येत नाही. याबाबत कोर्टसमोर नमूना दाखवला. यावर कोर्टाने पुढील सुनावणीत याचा विचार करू असे म्हंटल्याचे अ‍ॅड, आंबेडकर यांनी सांगितले.याचिकेतून प्रतिवादी राज्य सरकारला केले आहे. बदलापूर प्रकरणासारखेच परभणी प्रकरणात राज्य सरकारच आरोपी आहे. त्यामुळे राज्य सरकार आरोपी असून त्यांच्याकडून याचिकाकर्त्यांने आणि कोर्टाने अपेक्षा ठेवता येत नाही. याबाबत कोर्टसमोर नमूना दाखवला. यावर कोर्टाने पुढील सुनावणीत याचा विचार करू असे म्हंटल्याचे अ‍ॅड, आंबेडकर यांनी सांगितले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com